# महानगरपालिका अमरावती,

## महिला व बाल विकास विभाग

जा.क्र. अमनपा/मवावि/ 696 /2024 दिनांक 7 /02 / 2024

**कोटेशन नोटीस**

महिला व बाल विकास विभाग, महानगरपालिका, अमरावती यांचे कडून खालील काम करण्याकरीता कोटेशन मागविण्यात येत आहे. त्याकरीता संबंधीत कार्य करणाऱ्यांनी दरपत्रक मोहोर बंद लिफाफयामध्ये ( कोटेशन ) दि. 14 / 2 /2024 रोजी सकाळी 10. 30 ते दुपारी 12.00 वाजेपर्यंत या कार्यालयास सादर करावे. मुदतीत प्राप्त कोटेशन शक्य झाल्यास त्याच दिवशी उघडण्यात येईल.तसेच कुठलेही कारण न देता एक किंवा सर्व कोटेशन नाकारणे , स्वीकारणे यांचे अधिकार खाली सही करणार अधिकारी यांचेकडे राखीव ठेवण्यात येत आहे.

| क्र | कामाचे नाव | प्रती प्रशिक्षणार्थी दर सादर करावे |
|---|---|---|
| 1 | महानगरपालिका क्षेत्रातील मुली व युवतींना पोलीस / सैन्य भरतीपूर्व प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे | |

दरपत्रकासोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे :-

1. संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र अथवा SHOP ACT नोंदणी प्रमाणपत्र
2. संस्थेचे वा संस्थाचालकाचे पॅनकार्ड
3. संस्थेचे मागील लगतचे 03 वर्षाचे लेखापरीक्षण अहवाल अथवा ITR
4. शासकीय / निमशासकीय विभागाअंतर्गत कार्य अनुभव अथवा पोलीस / सैन्य किंवा महिलांसंबंधीत प्रशिक्षण राबविल्याचा पुरावा आवश्यक.
5. संस्था कोणत्याही शासकिय विभागाद्वारा काळया यादीत नसल्याचे व सोबत संलग्न केलेले सर्व कागदपत्र व माहिती सत्य असल्याचे 100 रु. स्टॅम्प पेपरवर शपथपत्र

वरील तांत्रीक पुर्तता न करणारे दरपत्रक अपात्र असतील .

अटी व शर्ती :-

1. महानगरपालिका महिला बालकल्याण करीता राखीव 5 टक्के स्वनिधी अंतर्गत सदर निवीदा प्रक्रिया करण्यात येत आहे.
2. सदरचा प्रशिक्षण कार्यक्रम अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील निवडक 60 विद्यार्थी ( मुली ) करीता राहणार आहे. परंतु संख्या कमी / जास्त करण्याचा अधिकार मनपास राहील.
3. प्रशिक्षणार्थी महिला असल्याने त्यांचेकरीता आवश्यक सुविधा प्रशिक्षण स्थळी असणे आवश्यक राहिल.
4. महिलांना ये – जा करण्याकरीताचे सोईने प्रशिक्षण स्थळ असावे .
5. प्रशिक्षण कालावधी 06 महिण्यांचा राहिल. व प्रती प्रशिक्षणार्थी यानुसार दर सादर करावे.
6. प्रशिक्षणाची संपूर्ण व्यवस्थेची जबाबदारी येणाऱ्या सर्व खर्चासह व इतर अनुषांगीक सर्व ही दरपत्रकधारकाची राहील मंजुर दराव्यतीरीक्त मनपा कडून कोणतेही देयक अथवा मानधन देणार नाहि.तसेच लेखी परीक्षा सरावाकरीता हे कार्यालय सुचवेल अशा नामांकीत शिकवणी संस्था / वर्गामध्ये प्रवेश द्वावा लागेल.

2021.10.10 09:52

Scanned with OKEN Scanner

7. प्रशिक्षण प्रती दिन किमान 5 ते 6 तासाचे  किंवा अभ्यासक्रमानुसार राहिल. प्रशिक्षणाच्या नमुद तासांचे कालावधीनुसार नियोजन करावे लागेल.

8. प्रशिक्षणामधे वा दरम्याण कोणत्याही प्रकारे वाद उदभवनार नाही याची जबाबदारी निवीदाधारकाची राहील परंतु ऐण केण प्रकारे वाद उदभवल्यास त्याला संस्था जबाबदार राहिल, कोणत्याही वादास / भुर्दंडास मनपा जबाबदार राहनार नाही. व त्यावर मा. आयुक्त जो निर्णय देतिल तो निवीदाधारकास बंधनकारक राहील.

9. व प्रशिक्षण संपल्यावर प्रमाणपत्र देणे बंधणकारक राहील.

10. प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करणे ही निवीदाधाकाची जबाबदारी राहील. मात्र प्रशिक्षणाबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास संस्थेकडुन खर्च वसूल करण्यात येईल व संस्थेची माण्यता रद्द करण्याची  तसेच काळया यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल.

11. प्रशिक्षणार्थी निवडीचा अधिकार महिला व बाल विकास विभाग या कार्यालयाचा राहील

12. महानगरपालिका वेळोवेळी जो आदेश देईल त्याची पूर्तता करणे निवीदाधारकास बंधनकारक राहील

13. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर 02  प्रतीत देयक देवकासोबत फोटो.. विहीत नमुण्यात लाभार्थ्यांची यादी (हार्ड व सॉफ्ट कॉपीसह) व हजेरी त्यांचे स्वाक्षरीसह या कार्यालयास सादर करावे लागेल

14. आवश्यकता वाटल्यास संस्थेचे प्रस्तावातील माहीतीनुसार स्थळ निरीक्षण करण्यात येईल व संस्थेकडे पुरेश्या सोईसुविधा असल्याची खात्री झाल्यावर योजना राबविण्याचे आदेश देण्यात येईल.

15. निवीदा मंजुर झाल्यास नियमानुसार लागू असलेल्या रकमेच्या स्टॅम्प पेपर वर कार्यालयात हजर राहुन करारनामा करुन द्यावा लागेल, व नियमानुसार सुरक्षा रक्कम जमा करावी लागेल,

16. दरकरारातील दर / दरकरारानुसार    अंतीम ) हे वा दरकराराचे दिनांकापासून एक वर्ष कालावधीपर्यंत अस्तीत्वात राहील कामाची गरज  व सद्यास्थिती पाहुण  काम करण्याचे आदेश देण्यात येईल. व ते निवीदाधारकास बंधनकारक राहिल.

17. अटी असलेल्या  निवीदा अमान्य असतील .

18. सदरचा कंत्राट अहस्तांरणीय असेल. कंत्रटदारास मुदतपुर्व कंत्राट सोडता येणार नाही. सोडल्यास  काळया यादीत टाकुन सुरक्षा रक्कम जप्त करण्यात येईल व  दुसरा कंत्राटदार नियुक्त करण्यात येईल. त्याबाबत निवीदाधारकास आक्षेप घेता येणार नाही.

19. वरील अटी / शर्तीमध्ये बदल करण्याचा , 1 अथवा जास्त निवीदा स्वीकारण्याचा , कोणत्याही टप्यात निवीदा प्रक्रीया रद्द करण्याचे सर्व अधिकार मा आयुक्त,मनपा अमरावती  यांना राहील.

20. निवीदा बाबत काही वाद निर्माण झाल्यास  न्यायालयीन मर्यादा अमरावती राहील.

21. वरील अटी व्यतीरीक्त अन्य अटी लागु करण्याचे सर्वाधिकार मा. आयुक्त, मनपा यांना राहिल व ते निवीदाधारकास बंधनकारक राहिल.

22. निवीदाबाबत  काही  अडचण असल्यास महिला व बालविकास विभाग येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

महिला व बालविकास अधिकारी
महानगरपालिका अमरावती

उपायुक्त सा.
महानगरपालिका अमरावती

प्रतिलीपी- सिस्टीम मैनेजर मनपा, अमरावती यांना मनपा पोर्टलवर नोटीन प्रसिद्ध करण्याकरीता

Scanned with OKEN Scanner